# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:04.03.2026** **वार:बुधवार**

1. बळकट अर्थव्यवस्थेमुळे भारत जगासाठी आशेचा किरण बनला असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन
2. आखाती देशांत अडकलेल्या राज्यातील नागरिकांना सुरक्षित मायदेशी आणण्यासाठी प्रयत्न सुरू
3. राज्यात धुळवडीचा सण मोठ्या उत्साहात साजरा
4. महाराष्ट्र दहशतवादी विरोधी पथकाचे विविध ठिकाणी छापे आणि
5. टी ट्वेंटी विश्वचषक क्रिकेट स्पर्धेच्या पहिल्या उपांत्य फेरीत आज दक्षिण आफ्रिका आणि न्यूझीलंड यांच्यात लढत

**अर्थसंकल्प वेबिनार**

बळकट अर्थव्यवस्थेमुळे भारत हा जगासाठी आशेचा किरण बनला असल्याचं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. अर्थसंकल्पानंतरच्या वेबिनारमधे 'शाश्वत आणि सशक्त आर्थिक प्रगती' या विषयावर ते दूरस्थ पद्धतीने बोलत होते. आज जग परिवर्तनशील आणि विश्वासार्ह भागीदाराच्या शोधात आहे, त्यामुळे भारताला ही एक मोठी संधी आहे, असं मोदी यांनी सांगितलं. विकसित भारताची संकल्पना स्पष्ट असल्याचं सांगताना मोदी म्हणाले.....

**मजबूत economy से पूरे विश्व की उम्मीद बना हुआ है, आज जब ग्लोबल सप्लाई चैन re-shape हो रही है, तब अर्थव्यवस्था की तेज प्रगति विकसित भारत का भी बहुत बड़ा आधार है। हमारी दिशा स्पष्ट है, हमारा संकल्प स्पष्ट है, Build more, produce more, connect more और अब जरूरत है Export more ।**

गुणवत्तेबाबत तडजोड न करण्याची जबाबदारी सर्वांची असून देशात तयार होणारी उत्पादनं जागतिक दर्जाची असायला हवीत असं ते म्हणाले. यावेळी पंतप्रधानांनी उद्योजकांना गुंतवणूक करण्याचं तसंच तंत्रज्ञानाचा स्वीकार करण्याचं आणि संशोधनाला प्रोत्साहन देण्याचं आवाहन केलं.

**मोदी-फोन**

पश्चिम आशियातल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल कतार, कुवेत, ओमान यासारख्या देशांच्या प्रमुखांशी दूरध्वनीवरून चर्चा केली. यावेळी त्यांनी आखाती देशांमधल्या परिस्थितीविषयी चिंता व्यक्त करत तिथे राहणाऱ्या भारतीयांच्या सुरक्षिततेबाबत चर्चा केली. दरम्यान राजनैतिक उपाय आणि संवादातून हा संघर्ष थांबवण्याचं आवाहन भारतानं केलं आहे. हा संघर्ष लवकरात लवकर संपवण्याच्या बाजूनं भारत आहे, आखाती देशांमध्ये जवळपास एक कोटी भारतीय राहतात, त्यांच्या सुरक्षिततेला भारताचं प्राधान्य आहे, असं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे प्रवक्त रणधीर जयस्वाल यांनी म्हटलं आहे. पश्चिम आशियातल्या युद्धजन्य परिस्थितीवर लक्ष ठेवण्यासाठी केंद्र सरकारनं मंत्र्यांची समिती स्थापन केली असून या समितीची दैनंदिन बैठक घेतली जात असल्याची माहिती केंद्रीय मंत्री पीयूष गोयल यांनी दिली आहे. पेट्रोलियम मंत्रालयानेही नियंत्रण कक्ष स्थापन केला आहे; भारताकडे 40 ते 45 दिवस पुरेल इतका तेलाचा साठा शिल्लक असून, गरज पडली तर आवश्यक त्या उपाययोजना केल्या जातील, असं पेट्रोलियम मंत्री हरदीप सिंह पुरी यांनी काल सांगितलं.

**युद्ध शिंदे-फडणवीस**

अमेरिका-इस्रायल आणि इराण संघर्षामुळे संयुक्त अरब अमिरातीमध्ये अडकलेल्या राज्यातल्या 164 जणांना परत आणण्यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दोन विमानांची व्यवस्था केली आहे. पश्चिम आशियाच्या संघर्षग्रस्त भागात

अडकलेल्या राज्यातल्या नागरिकांसाठी राज्य सरकारने 97-15-03-65-43-57 हा आपत्कालीन व्हॉट्सॲप मदत क्रमांक जारी केला आहे. आखाती देशांमध्ये अडकलेल्या नागरिकांना येत्या दोन ते तीन दिवसांत परत आणलं जाणार असून सरकार जलदगतीने पावले उचलत असल्याचं आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी काल नाशिकमध्ये बोलताना सांगितलं. कोणताही नागरिक मदतीशिवाय राहणार नाही आणि त्यांना सुरक्षितपणे परत आणण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जात असल्याचंही महाजन यावेळी म्हणाले. दरम्यान कोल्हापूर जिल्ह्यातले काही नागरिक सुखरूप मायदेशी परतले आहेत.

**गणकयंत्र-बुलडाणा**

बुलडाणा जिल्ह्यातील खामगाव तालुक्यातील कदमापूर जिल्हा परिषद शाळेचे शिक्षक राजेश कोगदे यांनी विद्यार्थ्यांना रंजक पद्धतीनं गणित शिकवण्यासाठी प्लास्टिकच्या पाईपपासून गणकयंत्र तयार केलं आहे. या यंत्रासाठी कोणतीही बॅटरी किंवा इलेक्ट्रिक साधनाची गरज नाही. या गणकयंत्राद्वारे विद्यार्थी बेरीज, वजाबाकी आणि गुणाकाराची उत्तरे पडताळून पाहू शकतात. याबाबत बोलताना राजेश कोगदे म्हणाले......

**विद्यार्थ्यांना गणित विषयाची भीती वाटू नये त्यांना गणित विषयामध्ये आवड निर्माण व्हावी आणि माझ्या वर्गातील कोणताही विद्यार्थी हा गणित विषयामध्ये अप्रगत राहू नये. मला गणित जमत नाही अशी भावना त्याच्या मनामध्ये राहू नये, या उद्देशानं मी हे गणक यंत्र तयार केलेलं आहे. या गणकयंत्राच्या माध्यमातून ज्या विद्यार्थ्याला गणित विषयामध्ये अतिशय अजिबात आवड नाही, तो विद्यार्थीसुद्धा अगदी हसत खेळत बेरीज वजाबाकी गुणाकार ह्या क्रिया करू लागला आणि माझ्या वर्गातील एकही विद्यार्थी गणित विषयात अप्रगत नाही.**

**होळी, धुळवड**

राज्यात काल सर्वत्र धुळवडीचा सण उत्साहाने साजरा केला गेला. जालन्यामध्ये पारंपरिक 'हत्ती रिसाला' मिरवणूकीच यंदाच 138 वं वर्ष होतं, अत्यंत उत्साहात हा उत्सव साजरा झाला. दरवर्षी धुलिवंदननिमित्त आयोजित केली जाणाऱ्या या भव्य मिरवणूकीत सजवलेल्या हत्तीवर एक प्रतीकात्मक राजा आणि त्याचा पंतप्रधान असतो. त्यांच्याकडून जमलेल्या लोकांना मिठाईचे वाटप करण्यात आलं. यवतमाळ इथं बंजारा समाजातील तांड्यात होळी पुजना नंतर परंपरेनुसार रंगांची उधळण आणि डफलीच्या तालात लेंगी नृत्यावर ठेका धरला होता तर बोरी येथील संत गदाजी महारांजांच्या यात्रेत गोटमार होळी रंगली. वाशीम शहरात रंगपंचमीचा सण महिलांनी आणि लहान मुलांनी मोठ्या उत्साहात साजरा केला. सिंधुदुर्ग जिल्ह्यात गणशेळवाडी इथल्या श्री देव धावगिरे देवस्थानच्या होळी उत्सवात भाविकांनी दरवर्षी किमान दोन आंब्याची झाडे लावायची असा नवा पायंडा या उत्सवाच्या निमित्तान घालण्यात आला आहे.

**एसटी**

राज्य परिवहन महामंडळाला पुढील पाच वर्षांत केवळ जाहिरातींच्या माध्यमातून 250 कोटी रुपयांपेक्षा अधिक महसूल मिळणार असल्याची माहिती एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली आहे. एसटी महामंडळाच्या मुख्यालयात पार पडलेल्या 310 व्या संचालक मंडळाच्या बैठकीत ते काल बोलत होते. सध्या जाहिरातींद्वारे एसटीला दरवर्षी 22 कोटी रुपयांचे उत्पन्न मिळते.

**बीज**

पुण्यातील देहूगाव इथं होणाऱ्या तुकाराम बीजसाठी राज्याच्या कानाकोपऱ्यातून येणाऱ्या हजारो भाविकांसाठी पीएमपी सव्वाशे जादा गाड्या सोडणार आहे. आजपासून सहामार्च दरम्यान पुणे आणि पिंपरी चिंचवडमधील महत्वाच्या स्थानकांवरून या गाड्या सोडण्यात येणार आहेत.

**लावणी**

सोलापूर जिल्ह्यातील अकलूज येथे सहकार महर्षि शंकरराव मोहिते पाटील जयंती समारंभ समितीच्यावतीने राज्यस्तरीय लावणी नृत्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. दोन दिवस चाललेल्या या स्पर्धेत प्रथम क्रमांकाचे बक्षीस

सोलापूर जिल्ह्यातील मोडनिंब इथल्या सांस्कृतिक कला केंद्राने पटकावले. 3 लाख रुपये आणि सन्मानचिन्ह असं त्याच स्वरूप होतं. आमदार दिलीप सोपल यांच्या हस्ते हे बक्षीस देण्यात आलं. या स्पर्धेत 11 संघांनी भाग घेतला होता.

**छापे**

महाराष्ट्र दहशतवादी विरोधी पथकाने काल मुंबई, यवतमाळ आणि अहिल्यानगर या तीन जिल्ह्यांमध्ये छापे टाकले. आय एस आय एस या दहशतवादी संघटनेशी संबंधित मुंबईत कुर्ला, शिवाजीनगर आणि गोवंडी भागात ही कारवाई करण्यात आली. अहिल्यानगर जिल्ह्यात 12 ठिकाणी शोधमोहीम राबवण्यात आली. या कारवाईत 74 लाख रुपये रोख, आणि धारदार शस्त्रं जप्त करण्यात आली. ही शस्त्र बाळगल्याबद्दल दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यवतमाळ जिल्ह्यात पुसद आणि उमरखेड भागातल्या 14 संशयितांना चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आलं आहे.

**नाटक- सांगली**

64 व्या महाराष्ट्र राज्य संगीतसूर्य केशवराव भोसले संगीत नाट्य स्पर्धेच्या अंतिम फेरीत गोव्याच्या समर्थ थिएटर्सच्या "संगीत कधी तरी कोठे तरी" या नाटकास प्रथम पारितोषिक, पुण्यातील भरत नाट्य संशोधन मंदिराच्या "संगीत पद्याराणी" या नाटकास द्वितीय आणि मुंबईतील परस्पर सहाय्यक मंडळ, वाघांबे या संस्थेच्या "संगीत स्वरसम्राज्ञी" या नाटकासाठी तृतीय पारितोषिक प्राप्त झालं आहे. गेल्या महिन्यात सांगलीतील विष्णूदास भावे नाट्यमंदिरात झालेल्या या स्पर्धेत एकंदर 14 नाट्यप्रयोग सादर करण्यात आले होते. सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी सर्व विजेत्या संघांचे अभिनंदन केलं आहे.

**कुस्ती**

महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघटनेच्यावतीने सोलापूर इथं 28 आणि 29 मार्चला चौथ्या महिला महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेचं आयोजन केलं जाणार आहे. 42 जिल्ह्यांच्या संघांचे 400हून अधिक खेळाडू या स्पर्धेत सहभागी होणार आहेत.

**अंत्यसंस्कार-लातूर**

ज्येष्ठ विचारवंत आणि माजी खासदार डॉ. जनार्दन वाघमारे यांच्यावर औसा तालुक्यातील कवठा इथं काल अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी राजकीय, शैक्षणिक, सामाजिक आणि साहित्य क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते. वाघमारे यांचं 2 मार्च रोजी वयाच्या 91 व्या वर्षी निधन झालं होतं.

**क्रिकेट**

वीस षटकांच्या क्रिकेट विश्वचषकाच्या पहिल्या उपांत्य फेरीत आज दक्षिण आफ्रिका आणि न्यूझीलंड यांच्यात कोलकाता इथल्या ईडन गार्डन्स मैदानावर खेळला जाणार आहे. दक्षिण आफ्रिकेने अपराजित राहत उपांत्य फेरी गाठली, तर न्यूझीलंडने सुपर आठमध्ये सरस धावगतीच्या जोरावर पाकिस्तानला मागे टाकत अंतिम चारमध्ये स्थान मिळवले. या प्रकारच्या विश्वचषकात हे दोन्ही संघ सहाव्यांदा आमनेसामने येणार आहेत.तर उद्या मुंबईत दुसऱ्या उपांत्य सामन्यात भारताचा सामना इंग्लंडशी होणार आहे.

**हवामान**

राज्यात बहुतांश भागात कमाल तापमान वाढत असल्याचं चित्र आहे. सोलापूरसह अकोला, अमरावती जिल्ह्यात 38 अंशांच्या आसपास तापमान नोंदवलं गेलं, येत्या 224 तासात राज्यात सर्वत्र कोरडं हवामान राहण्याचा अंदाज आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं,**

**नमस्कार.**